निवडक

नागेशी: गुढीपाडव्याला नागेशी मंदिरात पंचाग वाचन करताना मुख्य अर्चक प्रसाद जोशी. बाजूला मावळते अध्यक्ष दामोदर भाटकार व प्रसाद गावकर व इतर पदाधिकारी व भक्त.

मार्ना शिवोली : समाजसेवक शिवशंकर मयेकर यांच्या हस्ते सरपंच संदेश हडफडकर यांचा सन्मान.

संदेश हडफडकर यांचा सन्मान

■ टीम दैनिक हेराल्ड

शिवोली, दि. ६ : मार्ना शिवोली पंचायत सरपंच संदेश हडफडकर यांचा समाजसेवक शिवशंकर मयेकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.येथील समर्थ रामदास मठात हा कार्यक्रम संपन्न झाला . यावेळी मठाचे अध्यक्ष सदानंद गोवेकर,भजनी कलाकार जगन्नाथ मांद्रेकर,उद्देश पेडणेकर,सरोज सीमेपुरूशकर उपस्थितीत होते.सरपंच हडफडकर चांगले कार्य करीत असल्याचे प्रतिपादन मयेकर यांनी यावेळी केले.

समर्थ रामदास सेवा भक्ती मठात रामनवमी उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

शिवोली, दि. ६ : सडये शिवोली येथील समर्थ रामदास सेवा भक्ती मठात रामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी धार्मिक विधी झाल्यानंतर श्री समर्थ मूर्ती व पादुका वर अभिषेक महापूजा आरती झाली. त्यानंतर सांप्रदायिक उपासना, श्रीराम जन्म काळाचे कीर्तन सादर झाले. त्यांना साथ संगत हार्मोनियम वर उद्देश दिलीप पेडणेकर व तबला साथ श्याम मांद्रेकर यांनी केली. त्यानंतर श्रीराम व श्री समर्थ जन्मोत्सव व पाळणा सोहळा संपन्न झाला. सुवासिनी तर्फे दीपोत्सव प्रदक्षणा व आरत्या झाल्या. शिवशंकर मयेकर व वनिता मयेकर,सरपंच संदेश हडफडकर,पंच सदस्य ओमकार हरमलकर,शाहू कळंगुटकर तसेच शिवोली आमदार डिलायला लोबो यांनीही उपस्थिति राहून दर्शन घेतले.

उगवे येथे १२ पासून देवी माऊली देवस्थान मूर्ती पुनस्थापना सोहळा

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. ६ : पेडणे उगवे येथील श्री देवी माऊली देवस्थान मूर्ती पुनस्थापना सोहळा शनिवार १२ एप्रिल ते सोमवार द १४ एप्रिल रोजी अनेक विविध कार्यक्रमानिषी साजरा करण्यात येणार आहे.
शनिवार दि. १२ रोजी सकाळी ८ वाजता धार्मिक विधी, रात्र नऊ वाजता स्वरसुमनांजली हा गायनाचा कार्यक्रम सादर होणार आहे. रविवार दि. १३ रोजी सकाळी ८ वाजता धार्मिक विधी व नंतर शिखरकलश स्थापना होणार आहे. रात्र ९ वाजता ह.भ.प सौ. संध्याजी संतोष पाठक (पोतदार) यांचा सुश्राव्य कीर्तन सादर होणार आहे. सोमवार दि. १४ रोजी देवता पुन प्रतिष्ठापना कार्यक्रम होणार आहे व तदनंतर तीर्थप्रसाद व महाप्रसाद होणार आहे. दुपारी ३.३० वाजता श्री सत्यनारायण महापूजा व रात्री १० वाजता अलख निरंजन हे संगीत दोन अंकी नाट्यपुष्प सादर होणार आहे. तरी सर्व भाविक भक्तगणाने मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री माऊली देवस्थान समिती व ग्रामस्थ मंडळी उगवे तर्फे करण्यात आले आहे.

राजस्थाने नोंदवला शानदार विजय

नेहाल वढेराने ६२ धावांची शानदार खेळी : सॅमसन-जैस्वाल यांची उत्कृष्ट भागीदारी

चंदिगड, दि. ६ :

राजस्थान रॉयल्सने आयपीएल २०२५ मध्ये शानदार पुनरागमन करत सलग दुसरा विजय नोंदवला. संजू सॅमसनच्या संघाने मोसमातील चौथ्या सामन्यात पंजाब किंग्जचा त्यांच्याच घरच्या मैदानावर एकतर्फी ५० धावांनी पराभव केला. अशाप्रकारे पंजाब किंग्जला या मोसमात पहिल्या पराभवाचा सामना करावा लागला. पंजाब किंग्सच्या घरच्या मैदानावर आपल्या विजयाला ब्रेक लागला आहे.

पंजाबचे नवे माहेर असलेल्या मुल्लानपूर मध्ये झालेल्या या सामन्यात यजमान पंजाब किंग्जने शानदार फॉर्मसह उतरली होती. नवा कर्णधार श्रेयस अय्यर आणि नवे प्रशिक्षक रिकी पॉंटिंग यांच्या नेतृत्वाखाली पंजाब किंग्जने मोसमातील पहिले दोन सामने

एकतर्फी जिंकले. तर राजस्थान संघाने सुरूवातीचे दोन्ही सामने गमावले होते. पण राजस्थानने विजयी घोडदौड सुरू केली असून याचा प्रत्यय पंजाबविरूद्ध सामन्यात पाहायला मिळाला.

पंजाब किंग्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. राजस्थानने प्रथम फलंदाजी करत पंजाबला विजयासाठी २०७ धावांचे आव्हान दिले होते. पण लक्ष्याचा पाठलाग करताना पंजाबची सुरूवात खूपच खराब झाली. पहिल्याच षटकात जोफ्रा आर्चरने दोन मोठे विकेट घेतले. पहिल्याच चेंडूवर आर्चरने प्रियांश आर्यला क्लीन बोल्ड केलं. तर अखेरच्या चेंडूवर फॉर्मात असलेल्या कर्णधार श्रेयस अय्यरला क्लीन बोल्ड करत पंजाबला मोठे धक्के दिले.

यानंतर मार्कस स्टॉयनिस स्वस्तात बाद झाला. पण नेहाल वढेराने ४१ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकारांसह ६२ धावांची शानदार खेळी केली. तर मॅक्सवेल ३० धावा करत बाद झाला. पण यानंतर कोणत्याच फलंदाजाला चांगली कामगिरी करता आली नाही आणि सातत्याने गमावलेल्या विकेट्समुळे पंजाब सावरू शकला नाही. राजस्थानकडून आर्चरने ४ षटकांत २५ धावा देत ३ विकेट्स घेतले. तर संदीप शर्मा, महिश तीक्ष्णा यांनी २-२ विकेट घेतले. तर कुमार कार्तिकेय, हसरंगाने १-१ विकेट घेतली.

तत्पूर्वी या सामन्यात राजस्थान रॉयल्सने प्रथम फलंदाजी केली आणि कर्णधार संजू सॅमसन-यशस्वी जैस्वाल या सलामीच्या जोडीने अवघ्या १०.२ षटकांत ८९ धावांची उत्कृष्ट भागीदारी केली. गेल्या ३ सामन्यात सपशेल अपयशी ठरलेल्या यशस्वीने अखेर आपले कौशल्य दाखवत मोसमातील पहिले अर्धशतक झळकावले.

यानंतर रियान परागने अवघ्या २५ चेंडूत ४३ धावांची तुफानी खेळी करत संघाला २०० धावांच्या पुढे नेले. पंजाबने यादरम्यान काही झेलही सोडले, ज्याचा फायदा राजस्थानला मिळाला. राजस्थानने २० षटकांत ४ गडी गमावून २०५ धावा केल्या, ही या मैदानावरील सर्वोच्च धावसंख्या आहे. पंजाबकडून वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्युसनने सर्वाधिक २ विकेट घेतले.

आगोंद येथे उन्हाळी क्रिकेट शिबिराला प्रारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. ६ : मराठा वोरियर्स सातत्याने गेली ९ वर्षे अशा प्रकारची शिबिरें भरावीत आहे. त्याचे चांगले परिणाम दिसून येत आहेत. गोव्याच्या संघात आज हे खेळाडू दिसून येत आहेत. १ आक्टोबर २०२५ पासून आगोंद शासकीय मैदानावर केंद्र म्हणून सुरू होईल. पालकांनी आपल्या मुलांवर खेळ लादू नये, त्याची या विषयी आवड पाहून निर्णय घ्यावा. हे शिबिर संपल्यानंतर प्रशिक्षकांचा सल्ला घ्यावा.क्रीकेट हे त्यांच्यात दिसावे लागते. पावसाळ्यात शिबीराचे आयोजन केले जाईल. असे विचार गोवा क्रिकेट असोसिएशनचे सचिव शांभा नाईक देसाई यांनी व्यक्त केले.

मराठा वोरियर्स क्रिकेट क्लब काणकोण व गोवा क्रिकेट असोसिएशन संलग्न, १० ते १६ वर्षे वयोगटातील मुलां-मुलींसाठी उन्हाळी क्रिकेट शिबीराला आज दि. ६ एप्रिल रोजी, गोवा क्रिकेट असोसिएशनचे सचिव शानभाग नाईक देसाई यांच्याहस्ते उद्घघाटन करण्यात आले. हे शिबीर ६ एप्रिल ते दि. ३० रोजीपर्यंत आगोंद येथील शासकीय मैदानावर चालणार आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे शांभा देसाई सह भारतीय क्रिकेट खेळाडू व प्रशिक्षक दिनेश मोंगिया, जे. पी यादव, गोवा क्रिकेट असोसिएशनचे परेश फडते, अब्दुल माजीक, रणजी प्रशिक्षक सगुण कामत, परेश नाईक, रोबीन डिसौजा, अवधूत आमोणकर, फिजिओ दिपस्वी नाईक गावकर, मराठा वोरियर्सचे सचीव समीर देसाई, किरण नाईक गावकर, सम्राट भगत, शुभम गावस देसाई व अन्य व्यासपीठावर उपस्थित होते.

अशी शिबीरें आपल्या उज्वल भविष्यासाठी आयोजित केली जातात याचा फायदा घेऊन चांगले भविष्य घडवा असे सन्माननीय पाहुणे दिनेश मोंगिया यांनी यावेळी आपल्या भाषणात सांगितले. रुपेश नाईक यांनी ही यावेळी मनोगत व्यक्त केले. सुरवातीला समीर देसाई यांनी स्वागत केले. तर मनोज नाईक गावकर यांनी सुत्रसंचालन केले.

सेंट्रल स्ट्रायकर्स, रायझिंग स्टार व्हेटरन्स, ओमटेक्स वेस्टर्न लायन, पलक्कड व्हेटरन्स विजयी

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. ६ : क्रिकोकर्स हॉस्पिटॅलिटी गोवा यांनी आयोजित केलेल्या ५० प्लस क्रिकोकर्स क्रिकेट बॅश स्पर्धेत रविवारी सेंट्रल स्ट्रायकर्स इंदूरने क्रिकोकर्स हॉस्पिटॅलिटी गोवा संघाचा ९ गडी राखून पराभव केला. रायझिंग स्टार व्हेटरन्स नवी दिल्लीने स्प्रिंग फाल्कन शेष भारत संघाला ८ गडी राखून पराजित केले. ओमटेक्स वेस्टर्न लायनने वेस्टर्न युनायटेडचा ७ गडी राखून पराभव केला तर पलक्कड व्हेटरन्स केरळ संघाने धारवाड क्रिकेट अकादमीवर ८ गडी राखून मात केली. ओमटेक्स वेस्टर्न लायन मुंबई व सेंट्रल स्ट्रायकर्स इंदूर यांच्यात स्पर्धेचा अंतिम सामना होणार आहे. अ' गटात ओमटेक्स वेस्टर्न लायन व रायझिंग स्टार व्हेटरन्सने समान ४ गुण झाले होते. परंतु, सरस नेट रनरेटवर त्यांनी अंतिम फेरी गाठली. ब' गटात सेंट्रल स्ट्रायकर्स इंदूरने ३ पैकी ३ सामने जिंकत अंतिम फेरीत प्रवेश केला.

संक्षिप्त धावफलक

एमसीसी मडगाव - क्रिकोकर्स हॉस्पिटॅलिटी गोवा - २० षटकांत ९ बाद ६७ (लॉईड नाबाद २२, सत्येश कामत १४, जमिल खान १०-२, चंद्रप्रकाश ७-२, दिनेश शर्मा ५-२, शेख सादिक, अजय द्विवेदीव संजय चौबे प्रत्येकी २ बळी) पराभूत वि. सेंट्रल स्ट्रायकर्स इंदूर - १२ षटकांत १ बाद ६८ (नासिर अली नाबाद ४४, संजय चौबे नाबाद १७, रघुवीर कुंकळ्येकर १२-१).

चिखली मैदान - स्प्रिंग फाल्कन शेष भारत - २० षटकांत ६ बाद १६० (हरी ५१, बिजू नायर २५, राजेश गिल २१, राजू अरोरा १३-२, दाबू कौल, सुनील पंडिता, समीर मुखर्जी व राजवंश रैना प्रत्येकी १ बळी) पराभूत वि. रायझिंग स्टार व्हेटरन्स नवी दिल्ली - १५.५ षटकांत २ बाद १६१ (धीरज कुमार ५१, राजवंश रैना ५१, सुनील पंडिता नाबाद २२, रत्तन शर्मा २९-२).

एमसीसी मडगाव - वेस्टर्न युनायटेड - १८.३ षटकांत सर्वबाद ९३ (आशिष पारेख १९, संदीप भुर्के १५, राकेश बेडसे १२, राकेश मेहता ११-३, सारंग डेगवेकर १०-३, सुकेश शास्त्री १२-२, राजेश जांबळे ९-१) पराभूत वि. ओमटेक्स वेस्टर्न लायन - १२ षटकांत ३ बाद ९४ (मकरंद कुलकर्णी २५, अशोक सेठ नाबाद २२, अभिजित कदम नाबाद १५, निमेष दोशी, मनोज ओझा व दिलीप कामत प्रत्येकी १ विकेट).

चिखली मैदान - धारवाड क्रिकेट अकादमी धारवाड - १६.१ षटकांत सर्वबाद ९५ (सेंथिलकुमार वेलुसामी १७, राजू करुर १५, हरिष १३, सिद्धू पुजारी १२-३, राम कुमार २१-२, दिलीप के. ११-२, पीके रमण, श्रीराम व संजू प्रत्येकी १ विकेट) पराभूत वि. पलक्कड व्हेटरन्स केरळ -१५.५ षटकांत २ बाद ९६ (सिद्धू पुजारी नाबाद ३७, रवींद्रन के. ३०, प्रदीप गोडबोले १८-१, सेंथिलकुमार वेलुसामी ८-१).

'टग ऑफ वॉर' स्पर्धेत सरकारी हायस्कूल हणखणे विजयी

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. ६ : शासकीय माध्यमिक विद्यालय हनखणेचा १७ वर्षाखालील मुलीच्या संघाने क्रीडा खात्यातर्फे घेतलेल्या गोवा राज्य पातळीवरील टग ऑफ वॉर स्पर्धेत अजिंक्यपद प्राप्त केले. रस्सीखेच स्पर्धेत राज्य पातळीवर अजिंक्य पद प्राप्त करणारे पेडणे तालुक्यातील आजवरचे हे पहिले विद्यालय ठरले आहे. क्रीडा शिक्षक विश्राम सावंत यांनी या विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले होते. १७ वर्षाखालील या मुलींच्या संघात खुशी नाईक, मिलन नाईक, शर्वरी नाईक, मयुरी सावंत, साजदा खातून, नितीशा तळवणेकर, जान्हवी भद्रिके, शांती

हणखणे : रस्सीखेच स्पर्धेत अजिंक्यपद पटकावलेल्या हणखणे सरकारी हायस्कूलच्या संघासमवेत मुख्याध्यापक नरेंद्र नाईक, क्रीडाशिक्षक विश्राम सावंत व ज्येष्ठ शिक्षका नीता पेडणेकर.

पटकारे, मधुरा देसाई, सिद्धी वालम या मुलींचा समावेश होता.

विद्यालयाचे मुख्याध्यापक नरेंद्र नाईक, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सौ. अश्विनी घाटवळ यानी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

मुलांशी पालकांनी मित्रत्वाचे संबंध जोपासा

माशे : बारावी परीक्षेतील उत्कृष्ट निकालाबद्दल गौरविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांसोबत प्रमुख पाहुणे भास्कर नायक व इतर.

■ टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. ६ : आपल्या किशोरवयीन मुलांशी पालकांनी मित्रत्वाचे संबंध जोपासले तर या वयांत मुलांना सांभाळणे क्लेशकारक होत नाही, असे प्रतिपादन प्राचार्य भास्कर नायक यांनी केले.

श्री निराकार शिक्षण संस्था संचलित सत्यवती सोयरू आंगले उच्च माध्यमिक विद्यालय माशे काणकोण येथे आयोजित पालक बैठकींत ते बोलत होते. आपल्या प्रौढावस्थेत आपण सक्तीने वृद्धाश्रमात असणार कीं आपल्या मुलांसोबत हे किशोरावस्थेंत मुलांवर केलेल्या संस्कारांवर अवलंबून असते असेही ते पुढे म्हणाले. आपल्या जीवनात आपल्याला कोण व्हायचे आहे याचे नियोजन बारावी परीक्षेपुर्वी केल्यास महाविद्यालयीन प्रवेशाची निवड काळजीपूर्वक करता येते असे प्रतिपादन निराकार शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रशांत नाईक यांनी याप्रसंगी बोलताना केले.

यावेळी बारावीच्या परीक्षेत कला शाखेतून प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या नीतीशा नरेश रेडकर (९५.५०%)श्रावणी सुभाष पेडणेकर (९३.६६%) व मनस्वी मारुती देवीदास (८९.६६%) विज्ञान शाखेतील श्रावणी रामदास सुदीर (८५%) कृतीका नारायण गोसावी (८३.६६%) व भार्गवी राजेश पै (८३%) व वाणिज्य शाखेतून मॉली प्रशांत धुरी(८२.८३%)जॅडली फर्नांडिस (८१%)व अपेक्षा नमशीकर (७७.६६) यांचा भास्कर नायक यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच गोवा बोर्डात समाजशास्त्र विषयांत १०० गुण मिळवून प्रथम आलेल्या नीतीशा नरेश रेडकर, भूगोल विषयांत ९९ गुण मिळवून प्रथम आलेल्या श्रावणी पेडणेकर व शेती विषयांत ९७ गुण मिळवून प्रथम आलेल्या प्रज्ञा ज्ञानेश्वर भंडारी, अनेश अरुण प्रभुदेसाई व हर्ष अरुण पैंगीणकर यांनाही यथोचित गौरविण्यात आले. तसेच

२०२३-२४ सालचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त केलेल्या शिक्षिका चंद्र लेखा मेस्त्री यांनाही पा.शि. संघाच्या वतीने गौरविण्यात आले.

'सायकलिंग फॉर युनिटी' संकल्पनेतून मोहीम

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. ६ : गोवा बटालियन यन सी सी पणजी अंतर्गत कार्यरत युनिट ९/१, राधाकृष्ण विद्यालय, डिचोली येथील ३० यन सी सी कॅडेट्सनी सायकलिंग फॉर युनिटी या घोषवाक्यासह ५० किलोमीटरची एक दिवसीय सायकल मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केली.

मुख्याध्यापिका सौ. हेमा चाणेकर यांच्या हस्ते या मोहिमेचा झेंडा दाखवून उत्साहात प्रारंभ करण्यात आला. त्यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून सर्व कॅडेट्सना शुभेच्छा दिल्या.

ही साहसी सायकल यात्रा डिचोली येथून सुरू होऊन, निसर्गरम्य मये तलाव, ऐतिहासिक सप्तकोटेश्वर मंदिर नार्वे, सांस्कृतिक वारसा लाभलेले दिवाडी बेट, तसेच जगप्रसिद्ध जुने गोवा चर्चेस मार्गे पुन्हा डिचोली त येथे संध्याकाळी ५.३० वाजता सुरक्षितपणे पूर्ण झाली.

या मोहिमेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, संघभावना व थेट अनुभवातून शिकण्याची संधी निर्माण करणे हा होता. सोबतच गोव्याच्या सांस्कृतिक व धार्मिक ठिकाणांची ओळख देखील विद्यार्थ्यांना झाली.

संपूर्ण मोहिमेचे नियोजन व नेतृत्व शाळेचे यन सी सी अधिकारी ऑफिसर रौफखान पठाण यांनी केले, तर श्री. मितेश गावंकर या उदयोन्मुख यन सीसी अधिकाऱ्याने त्यांना सहकार्य केले. या यशाबद्दल कर्नल जेसस बेनिनो फुतार्दो, ले. कर्नल अमोल लहाटे तसेच शाळेतील शिक्षकवर्गाने सर्व कॅडेट्सचे मन:पूर्वक अभिनंदन केले

सायकल रॅलित सहभागी झालेले विद्यार्थी

छायाचित्रातून ग्रामीण जीवन, लोकसंस्कृतीचे दर्शन

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. ६ : रावण सत्तरी येथे साहित्य मंथन सत्तरीतर्फे चौथ्या ग्रामीण साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या छायाचित्र प्रदर्शनाला साहित्यिक तसेच ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. लोकमतचे वरिष्ठ छायापत्रकार गणेश शेटकर यांच्या संग्रहातील एकूण ४० छायाचित्रांचा प्रदर्शनात सहभाग होता. संमेलनात सहभागी झालेल्या पर्येच्या आमदार तथा गोवा वन विकास महामंडळाच्या अध्यक्षा डॉ.दिव्या राणे,ज्ञानपीठ पुरस्कार विजेते लेखक दामोदर (भाई) मावजो, केंद्रीय साहित्य अकादमी पुरस्कार विजेते लेखक प्रा. प्रवीण बांदेकर, ज्येष्ठ लेखक प्रा. मोहन कुंभार व इतर मान्यवरांनी छायाचित्र प्रदर्शनाचे कौतूक केले.

बदलते जीवन आणि राहणीमान यांच्यात आपली परंपरा, लोकजीवन, लोकसंस्कृती, पूर्वापार चालत आलेल्या रुढी परंपरा, राजभरातील उत्सव छायाचित्रांच्या माध्यमातून पहायला मिळाले असे उदगार प्रदर्शनाच्या उद्घाटनानंतर मान्यवरांनी काढले.

लोकवेद संशोधक कमलाकर म्हाळशी, केंद्रीय साहित्य अकादमी

साखळी : गणेश शेटकर यांच्या प्रदर्शनातील छायाचित्रे पाहताना दामोदर मावजो, प्रा. प्रवीण बांदेकर व डॉ. प्रकाश पर्येकर, कमलाकर म्हाळशी, देवयानी गावस, सुप्रिया गावस, नंदिता गावस व इतर.

पुरस्कार विजेते लेखक डॉ.प्रकाश पर्येकर, केरी जिल्हा पंचायत सदस्य देवयानी गावस, केरीच्या सरपंच सुप्रिया गावस,उपसरपंच उस्मान सय्यद, रावणच्या पंचसदस्य नंदीता गावस, गोवा कोकणी अकादमीचे प्रभारी अध्यक्ष वसंत सावंत, लोकककलाकार कांता गावडे, कृषीतज्ज्ञ डॉ. सचिन तेंडूलकर आदी मान्यवरांनी छायाचित्र प्रदर्शनाला भेट दिली.

गणेश शेटकर गेली पंचवीस वर्षे छायाचित्राचा छंद जोपासतात. वर्तमानपत्रात काम करीत असतानाच राज्यभरातील विविध सण, धार्मिक विधी, ग्रामीण भागातील स्थळांना भेटी देतात. या भ्रंमंतीतून टिपलेली निवडक छायाचित्रे रावण येथील प्रदर्शनात मांडण्यात आली होती. विस्मृतीत गेलेले अनेक क्षण छायाचित्रांच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भावी पिढीला हे क्षण छायाचित्रांच्या माध्यमातून पाहता येतील. दोन दिवशीय छायाचित्र प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी ग्रामीण साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष तसेच श्री सातेरी केळबाय घाडवंश देवस्थानचे अध्यक्ष सत्यवान गावस, साहित्य मंथन सत्तरीचे अध्यक्ष काशिनाथ नायक यांचे विशेष सहकार्य लाभले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २१४ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 214 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .